**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ याची जबानी**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की : —

**माझे नाव : विनोद भानुदास बुलाखे**
वय : ३७ वर्षे, पेशा : व्यवसाय,
राहणार : देउळगांव सिध्दी, ता. जि.अहमदनगर.

**शपथेवर सरतपास सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती.ए.व्ही. बाबर :**

१. दि.१६/०३/२०२३ रोजी सायंकाळी ५.३० वाजताचे सुमारास मी माझे इस्त्रीच्या दुकानात काम करत असताना माझा भाचा सार्थक खुडे व्यायाम करण्यासाठी सायकलवरून जात असताना आमच्या गावातील व्यक्ती सुरज गिरवले हे त्याचे पाठीमागे हिरवे रंगाची चारचाकी बोलेरो वाहनाने आले आणि माझे भाच्याला थांबविले व त्यास दमदाटी केली. सुरज गिरवले माझे भाचास सायकल त्याचे गाडीला आडवी का मारतो असे म्हणुन दमदाटी करत होता. मी सदर घटना माझे दुकानाच्या खिडकीतून पाहिली म्हणुन मी तेथे गेलो. मी सुरजला लहान मुलांना दमदाटी का करतो म्हणुन विचारणा केली. त्याचा राग सुरजला आला व त्याने मलाही शिवीगाळ करण्यास सुरूवात केली. सुरजने त्याचे गाडीतून लोखंडी पाईप काढुन आणला व माझे पाठीवर डाव्या बाजुला, हाताच्या दंडावर मारला. त्याने मलाही तुझे हातपाय तोडेन व जिवे मारीन अशी धमकी दिली. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला सदर घटनेची तक्रार दिली. मी त्याच दिवशी पोलीसात तक्रार देण्यासाठी गेलो होतो. पोलीसांनी मला यादी देवुन जिल्हा रूग्नालय, अहमदनगर येथे उपचाराकामी पाठविले होते. म्हणुन माझी फिर्याद दुस—या दिवशी नोंदविण्यात आली. मला आता फिर्याद दाखविले. त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१२** देण्यात येते.

२. दुस—या दिवशी पोलीसांनी माझे दुकानाच्या समोर येवुन पाहणी केली. पोलीसांनी जागेचे फोटो काढुन घेतले. त्यावेळी लोखंडी पाईपही त्यांना तेथेच मिळाला. तो त्यांनी जप्त केला. मला आता दोषारोपपत्रासोबत दाखल

फोटो दाखविले. हेच ते फोटो आहेत. मी आरोपीला ओळखतो. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे. मला ज्या लोखंडी पाईपने मारहाण केली तो दाखविल्यास मी ओळखू शकतो.

मुद्देमाल दाखल नसल्याने सरकारी अभियोक्तांच्या तोंडी विनंतीवरून पुढील सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

( माया अ. देशमुख )
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.८, अहमदनगर

**दि.१०/१०/२०२३**

**शपथेवर पुढील सरतपास सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती.ए. व्ही. बाबर :**

३. मला आता जप्त मुददेमाल दाखविला. हाच तो लोखंडी पाईप आहे ज्याने मला मारहाण झाली होती. त्यास आर्टीकल/ऑब्जेक्ट **'अ'** देण्यात येते.

**शपथेवर उलटतपास आरोपीतर्फे त्यांचे वकील :**

४. माझे शिक्षण चौदावीपर्यंत झालेले आहे. मला मराठी लिहिता—वाचता येते. देउळगांव सिध्दी ते नगर तालुका पोलीस स्टेशन मधील अंतर अंदाजे २९ किलोमीटर आहे. वाहनाने अर्ध्या ते पाउन तासात सदर अंतर पार करता येते. अभियोग पक्षाने दोषारोपपत्रात नमूद केलेले साक्षीदार माझे नातेवाईक आहेत. घटनास्थळाचे शेजारी रविंद्र चिटके यांचे हॉटेल आहे तसेच एक दुध डेअरी आहे. मी लॉन्ड्री चालवितो हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझेकडे नाही. हिरव्या रंगाची बोलेरोचा वाहन क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, अशा पध्दतीची वाहने एकापेक्षा जास्त असू शकतात. मी लोखंडी पाईपचे वर्णन तक्रारीत दिलेले नाही.

५. मी माझे दुकानाचे खिडकीतून आरोपी माझे भाच्याला दमदाटी करत असताना पाहिले हे माझे तक्रारीत नमूद नाही. घटनास्थळावरील रस्ता हा सिमेंट कॉंक्रीटचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला मारहाण केली, शिवीगाळ केली व दमदाटी केली असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे विरोधात खोटा राग असल्याने खोटी तक्रार दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयात आरोपीने मला मारहाण केली अशी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

( माया अ. देशमुख )
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०८, अहमदनगर

**दि.१९/१०/२०२३**